# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## सिंहस्थ कुंभमेळ्यात अमृत पर्वणीला खासगी वाहनांना 'नो एंट्री'!

**नाशिक :** पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यातील अमृत पर्वणीच्या दिवशी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर शहरात भाविकांच्या खासगी वाहनांना थेट प्रवेश दिला जाणार नाही. देशभरातून येणाऱ्या भाविकांची वाहने शहराबाहेर उभारण्यात येणाऱ्या नियोजित वाहनतळांवर थांबवली जाणार आहेत. त्यानंतर भाविकांना विशेष बससेवेद्वारे अमृत स्नानाच्या ठिकाणी नेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## नाशिकमध्ये 10 लाख 27 हजार मतदारांची नावे वगळली

**नाशिक :** मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण अर्थात एसआरआर मोहिमेत नाशिक जिल्ह्यात तब्बल १० लाख २७ हजार ८९४ मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. मात्र, आतापर्यंत या वगळलेल्या नावांच्या अनुषंगाने कोणतीही हरकत किंवा तक्रार दाखल झालेली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे पात्र मतदारांनी आपले नाव यादीत आहे की नाही, याची खात्री करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अन्नातून विषबाधा; बहीण-भावाचा मृत्यू, थोटे कुटुंबावर दु:खाचा डोंगर

**कन्नड :** दि.११ सप्टेंबर - अन्नातून विषबाधा झाल्याने एकाच कुटुंबातील चार जणांना उलट्या-जुलाबाचा त्रास झाल्यानंतर उपचार सुरू असताना बहीण-भावाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना चिंचोली लिंबाजी येथे घडली. आयुष नारायण थोटे याचा गुरुवारी पहाटे मृत्यू झाल्यानंतर शुक्रवारी त्याची सहा वर्षीय बहीण गायत्री नारायण थोटे हिचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून थोटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

चिंचोली लिंबाजी येथील थोटे कुटुंबातील चार जणांना मंगळवारी रात्री घरातील खिचडी खाल्ल्यानंतर विषबाधेसदृश त्रास झाला. त्यांना उलट्या-जुलाब सुरू झाल्यानंतर स्थानिक पातळीवर उपचार करण्यात आले. मात्र, प्रकृती बिघडल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले.

या घटनेत आयुष नारायण थोटे याचा गुरुवारी (दि. १०) पहाटे ५.१५ वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर त्याची सहा वर्षीय बहीण गायत्री नारायण थोटे हिच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील खासगी दवाखान्यात उपचार सुरू होते. मात्र, शुक्रवारी (दि. ११) सकाळी ८.१५ वाजता उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

गायत्रीच्या मृत्यूची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी हे पथकासह चिंचोली लिंबाजी येथे दाखल झाले. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त मेमोच्या आधारे पिशोर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून,



मृतदेह शवविच्छेदनासाठी घाटी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी फारूक सिद्दीकी यांनीही घटनास्थळी भेट दिली. त्यांनी घरातील अन्नाचे विविध नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले आहेत. तसेच फॉरेन्सिक पथकालाही गावात पाचारण करण्यात आले असून घटनास्थळावरील परिस्थिती आणि उपलब्ध पुराव्यांची तपासणी करण्यात येत आहे.

प्राथमिक माहितीनुसार अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे हा प्रकार घडल्याचे समोर येत असले, तरी मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आणि रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे अन्नातून विषबाधा नेमकी कशामुळे झाली, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रकरणाची चौकशी पोलीस नाईक एफ.एन. बर्डे यांच्याकडे सोपविण्यात आली असून, नातेवाईकांची चौकशी आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

एकाच कुटुंबातील दोन चिमुकल्यांचा अवघ्या काही तासांच्या अंतराने झालेला मृत्यू मन हेलावून टाकणारा ठरला असून, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

## थोडक्यात वार्ता

### महागाई वाढण्याची आणि रुपया कमजोर होण्याची शक्यता

**नवी दिल्ली:** पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत प्रचंड वाढ झाली असून, ब्रेंट क्रूड प्रति बॅरल ११० डॉलरच्या तर वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट (डब्ल्यूटीआय) क्रूड १०५ डॉलर प्रति बॅरलच्या जवळ पोहोचले आहे. भारताच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात केले जात असल्यामुळे, या दरवाढीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे महागाई वाढण्यासह रुपयावर मोठा दबाव आला आहे. टीएनव्ही फायनान्शियल सर्व्हिसेसचे सीईओ तारकेश्वर नाथ वैष्णव यांच्या मते, कच्चे तेल महाग झाल्यामुळे भारतीय तेल कंपन्यांना डॉलरची मागणी वाढवावी लागली आहे. यामुळे डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया विक्रमी घसरणीसह ९५.८० रुपयांच्या पातळीवर पोहोचला आहे. भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) बाजारात डॉलर पुरवठा करून रुपयाला सावरण्याचा प्रयत्न करत असली, तरी क्रूडच्या किमती याच पातळीवर राहिल्यास देशाच्या परकीय चलन साठ्यावर मोठा ताण येऊ शकतो.

### 'लाइव्ह इव्हेंट'साठी राज्य सरकारकडून 'एसओपी'

**मुंबई :** संगीत कार्यक्रम, सांस्कृतिक महोत्सव, क्रीडा स्पर्धा आणि प्रदर्शनांसह विविध 'लाइव्ह इव्हेंट'च्या परवानग्यांसाठी राज्य सरकारने प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) मंजूर केली आहे. त्यामुळे विविध विभागांच्या परवानग्यांसाठी स्वतंत्र कार्यालयांत जाण्याऐवजी एकाच डिजिटल प्रणालीतून अर्ज, छाननी, मंजुरी आणि शुल्क भरण्याची प्रक्रिया होणार आहे. कार्यक्रमांच्या परवानग्या कालबद्ध पद्धतीने मिळाव्यात आणि आयोजनातील प्रक्रियात्मक अडथळे कमी व्हावेत, हा यामागील उद्देश आहे. माहिती व जनसंपर्क विभागाच्या समन्वयाने ही व्यवस्था राबविली जाणार असून, पोलीस, वाहतूक पोलीस, महापालिका किंवा ग्रामपंचायत, अग्निशमन दल, विद्युत सुरक्षा, राज्य उत्पादन शुल्क, परदेशी कलाकारांसाठी एफआरआरओ, वारसास्थळांवरील कार्यक्रमांसाठी पुरातत्त्व विभाग आणि संगीत परवान्यांसह आवश्यक मंजुरींचा त्यात समावेश असेल. कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार महाराष्ट्र सागरी मंडळासह अन्य संबंधित प्राधिकरणांच्या परवानग्याही या प्रणालीतून घेता येतील.

### राज्यावर दुष्काळाचे सावट ! - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**पुणे :** राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने पिके संकटात सापडली असून, दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी पेरलेली पिके जळण्याच्या अवस्थेत आहेत. राज्यातील परिस्थितीचा अहवाल पुढील तीन-चार दिवसांत प्राप्त झाल्यानंतर सरकार योग्य तो निर्णय घेईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शुक्रवारी दिली. तसेच कमी पाऊस झालेल्या भागांचा आपण पुढील आठवड्यापासून दौरा करणार असल्याचेही भरणे यांनी सांगितले पुण्यात माध्यमांशी बोलताना भरणे म्हणाले की, जूनमध्ये पाऊस झाला नाही, जुलैमध्ये काही प्रमाणात पाऊस झाला; मात्र ऑगस्टमध्ये पावसाने मोठा खंड दिला. पुणे, कोकण आणि ठाणे परिसराचा काही भाग वगळता मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्राचा पूर्व भाग आणि उत्तर महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले. त्यामुळे शेतकरी अडचणीत असून कापूस आणि सोयाबीनचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाअभावी बैलपोळ्याच्या सणावरही परिणाम झाला असून शेतकरी नाराज असला तरी वर्षभर शेतकामात साथ देणाऱ्या बैलाची पूजा करण्याचे कर्तव्य म्हणून हा सण साधेपणाने साजरा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना ५० हजार रुपये आणि मजुरांना २५ हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी रोहित पवार यांच्यासह काही आमदारांनी केली आहे.

### "शाल जोडे"




# परभणीतील सर्व कर्मचारी व बँक अधिकारी संपावर

## प्रलंबित मागण्याकडे लक्ष वेधण्यासाठी पुकारला एक दिवशी लाक्षणिक संप




हिंदू प्रकाश वार्ता अशोक पवार

**परभणी:-** गेल्या अनेक दिवसापासून बँक कर्मचारी व अधिकारी पाच दिवसाचा बँकिंग सप्ताह लागू करावा कर्मचारी व अधिकाऱ्यांना न्याय समान आणि भेदभाव रहित पी एल आय मीळावे तसेच बँक कर्मचारी अधिकाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याकडे केंद्र सरकार व संबंधित व्यवस्थापनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर शुक्रवार रोजी एकदिवसीय देशव्यापी लाक्षणिक संप पुकारण्यात आला असून या संपात परभणीतील बँक अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले युनायटेड फॉर्म ऑफ बँक युनियनच्या आवाहनानुसार दिनांक 11 सप्टेंबर शुक्रवारी देशभरातील बँक कर्मचारी व अधिकाऱ्याने एक दिवसीय लाक्षणिक संप पुकारला होता सहभागी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्याकडे लक्ष वेधण्यासाठी जोरदार घोषणाबाजी केली व देशाच्या बँकेत व्यवस्थेचा कणा असलेले कर्मचारी अधिकारी यांच्या न्याय मागणीसाठी व मागण्याकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष करू नये व मागण्याची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी यावेळी यांच्यातर्फे करण्यात आली व मागण्या मान्य न झाल्यास आगामी काळात तीव्र आणि स्वरूपाचे आंदोलन करण्याचा कर्मचारी संघटनांनी दिला याला क्षणिक बंद मध्ये जिल्ह्यातील सर्व बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला होता

## परभणी मध्ये एमडी पावडर व चरस जप्त; तीन जनावर गुन्हा दाखल

हिंदू प्रकाश वार्ता अशोक पवार

**परभणी:-** परभणी शहरात अनेक ठिकाणी रेल्वे स्टेशन बस स्टँड शहरातील रिकाम्या जागेवर शहराच्या आजूबाजूला असणाऱ्या झाडे झुडपामध्ये नशेच्या व्यसनाधीन झालेले तरुण युवक यांचे टोळ्यांच्या टोळ्या दिसून येतात अनेक प्रकारचे नशा करतात त्यामध्ये दारू गांजा चरस अफीम व शैक्षणिक साहित्यात वापरण्यात येणारे व्हाइटनर दवाखान्यात वापरण्यात येणारे खोकल्यासाठी वापरण्यात येणारे दवा यांचा सर्रास हमखास वापर करण्यात येतो अशाच प्रकारे नशेसाठी वापरण्यात येत असलेले चरस जप्त करण्यात आलेले आहे नानलपेठ पोलीसांच्या विशेष पथकाने 10 सप्टेंबर रोजी दुपारी सव्वा जून च्या सुमारास खंडोबा बाजार रोडवर मराठवाडा हायस्कूलच्या संरक्षक भिंतीला लागून ती कारवाई केली आहे एकूण 107560 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे याप्रकरणी तीन जनावर नानल पेठ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला नानल पेठ पोलिसांच्या खबऱ्यांकडून माहिती मिळाली की एक इसम त्याच्याजवळ अवैधरित्या चरस एमडी पावडर हि अमली पदार्थ विक्री करण्यासाठी बाळगून आहे अशी माहिती मिळताच त्यांनी नानल पेठ पोलीसाच्या विशेष पथकाने सदरील ठिकाणी छापा टाकून सदरील ठिकाणी एक व्यक्ती संशयास्पद हालचाली करत असताना आढळून आला पोलिसांनी त्याला लगेच ताब्यात घेतले व त्याची चौकशी केली असता समजिताने आपले नाव मोहम्मद अन्वर मोहम्मद यासीन असे सांगितले त्याच्याजवळ 70 हजार रुपये किमतीचा एमडी पावडर व साडेसात हजार रुपये किमतीचे चरस मिळून आले त्याला पोलीस खात्या दाखवल्यानंतर संबंधिताने ओळखीतील शेख शोयब शेख गोस व शेख गौस या दोघांनी अमली पदार्थ विक्रीसाठी आणून दिल्याचे या कार्यवाहीत एकूण 1 लाख 7 हजार 560 रुपये किमतीची आमलीं पदार्थ जप्त करण्यात आले.

## ट्रक -दुचाकीचा अपघात :तीन मित्रांचा मृत्यू!



स्व. कैलास टुले   स्व. अक्षय शिंदे   स्व. ऋषिकेश फुलझळके

बीड – बीड नजीक असलेल्या उखंडा तलावाजवळ ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात तीन तरुण मित्रांचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. हे तिघे तरुण नवगण राजुरी येथील रहिवाशी असून या घटनेमुळे परिसरावर शोककळा पसरली आहे.

कैलास टुले, ऋषिकेश फुलझळके आणि अक्षय शिंदे अशी मृतांची नावे आहेत. अहिल्यानगर बीड महामार्गाचे काम सध्या सुरु आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी खड्डे तसेच अर्धवट पूल आहेत.

उकंडा तळ्याजवळ पुलाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी त्यांच्या दुचाकीला भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की तिघांचाही जागीच मृत्यू झाला.दरम्यान, पुलाच्या कामाच्या ठिकाणी वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक दिशादर्शक फलक, रेडियम पट्टे अथवा इतर सुरक्षाव्यवस्था नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. बीड-नवगण राजुरी मार्गाचे राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. बांधकामाच्या ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था करणे अपेक्षित असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने हा अपघात घडल्याचा आरोप होत आहे.

# वाळलेली पिके हातात घेऊन शेतकरी आयुक्तकार्यालयावर

## दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी बाबाजानी दुर्राणी आक्रमक; बॅरिकेडजवळ पोलिस-शेतकरी आमनेसामने

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्याने शेती संकटात सापडली आहे. अनेक भागांत पिके वाळत असल्याचा दावा करत दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे मोर्चा वळवला. माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेतकरी वाळलेली पिके घेऊन कार्यालयासमोर दाखल झाले. पावसाअभावी खरीप हंगाम धोक्यात आल्याचे सांगत शेतकऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीची तातडीने पाहणी करून मराठवाड्यातील दुष्काळसदृश भागाबाबत शासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या परिसरात आंदोलनकर्त्यांची गर्दी वाढल्यानंतर पोलिसांनी बॅरिकेड लावून त्यांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बॅरिकेडच्या आत जाण्यावरून काही काळ शेतकरी आणि पोलिसांमध्ये तणाव निर्माण झाला. यावेळी दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक संघर्ष




झाल्याचे पाहायला मिळाले. हातात वाळलेली पिके घेऊन आलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतीची अवस्था प्रशासनासमोर मांडली. पाऊस नसल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना तातडीने मदतीची गरज असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत मराठवाड्यातील पावसाची आणि पिकांची वस्तुस्थिती शासनाने गांभीर्याने घ्यावी, अशी मागणी केली. महसूल प्रशासनाने प्रत्यक्ष शेतपातळीवर परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

# रस्ता रुंदीकरणाच्या वादातून मंत्री अतुल सावे यांच्या पुतण्यावर प्राणघातक हल्ला

## लोखंडी रॉड, काठ्याने डोक्यावर वार; खांदवाडीत घटनेने खळबळ, अजित सावे व अमय सावे गंभीर जखमी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पैठण तालुक्यातील खांदवाडी येथे रस्ता रुंदीकरणाच्या वादातून मंत्री अतुल सावे यांच्या पुतण्यावर लोखंडी रॉड आणि काठ्याने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना गुरुवारी (१० सप्टेंबर) दुपारी घडली. या हल्ल्यात मंत्री अतुल सावे यांचे बंधू अजित सावे (वय ७०) आणि पुतण्या अमय सावे (वय ३५) हे गंभीर जखमी झाले आहेत. अमय सावे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. सुरुवातीला शासकीय रुग्णालयात उपचार केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत असून, घटनेमुळे खांदवाडी परिसरात खळबळ उडाली आहे.

खांदवाडी येथे गेल्या सुमारे दोन वर्षांपासून काँक्रीट प्लांट सुरू आहे. या प्लांटमुळे परिसरातील रस्त्यावर वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत असल्याने रस्ता रुंदीकरणाचा प्रयत्न सुरू होता. गुरुवारी काही जणांनी घटनास्थळी वाहने आणून रस्ता अडविला. त्यानंतर रस्ता रुंदीकरणाच्या मुद्द्यावरून वादाला सुरुवात झाली.

रस्त्याच्या जागेबाबत काही आक्षेप असल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देणे किंवा अधिकृत मोजणी करून घेणे, अशी भूमिका अमय सावे यांनी घेतल्याचे सांगण्यात आले. मात्र, यावरून वाद वाढला आणि संबंधितांनी त्यांच्याशी हुज्जत घालत मारहाण करण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे.

वादाचे रूपांतर झटापटीत झाल्यानंतर अमय सावे यांच्या डोक्यावर लोखंडी रॉड आणि काठ्याने वार करण्यात आले. या हल्ल्यात अजित सावे हेही गंभीर



जखमी झाले. गंभीर दुखापत झाल्याने दोघांनाही तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. अमय सावे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे.

हल्ल्याचे फोटो, व्हिडिओ पोलिसांकडे

हा प्रकार केवळ रस्ता रुंदीकरणाच्या वादापुरता मर्यादित नसून जीव घेण्याच्या उद्देशाने हल्ला करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हल्ल्याच्या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ पोलिसांकडे देण्यात आले असून, त्यामध्ये हल्ल्यात सहभागी असलेले काही जण स्पष्टपणे दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांकडून आरोपींची ओळख पटवून तातडीने कारवाई होण्याची शक्यता आहे.

### 'जीव मारण्याच्या उद्देशानेच हल्ला'

**खांदवाडी येथे रस्ता रुंदीकरणाच्या विषयावरून वाद झाला. रस्त्याबाबत काही प्रश्न असल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र देऊन किंवा अधिकृत मोजणी करून घेता आली असती. मात्र, त्याऐवजी माझ्या पुतण्यावर लोखंडी रॉड आणि काठ्याने हल्ला करण्यात आला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. माझे बंधू अजित सावे हेही या घटनेत गंभीर जखमी झाले आहेत. हा हल्ला जीव मारण्याच्या उद्देशानेच करण्यात आल्याचा माझा आरोप आहे. घटनेचे फोटो व व्हिडिओ पोलिसांना देण्यात आले आहेत. आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी मी पोलिस अधिकाऱ्यांकडे केली आहे.**

**- मंत्री अतुल सावे**

घटनेनंतर मंत्री अतुल सावे यांनी पोलिस अधीक्षक, पोलिस निरीक्षक तसेच विशेष पोलिस महानिरीक्षकांशी संपर्क साधला. हल्लेखोरांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

खांदवाडी परिसरात काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून दहशत निर्माण केली जात असल्याचे आरोपही या घटनेनंतर करण्यात आले आहेत. औद्योगिक परिसर आणि एमआयडीसी भागात दादागिरी तसेच हप्ता वसुलीचे प्रयत्न होत असल्याचा आरोप असून, या पार्श्वभूमीवर पोलिसांसमोर परिसरातील गुंडगिरीला आळा घालण्याचेही आव्हान निर्माण झाले आहे. दरम्यान, या हल्ल्याप्रकरणी पोलिस तपास सुरू असून, आरोपींवर कोणती कारवाई होते याकडे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

## पुण्याचा ऐतिहासिक गणेशोत्सव आणि प्रशासकीय सजगता

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वैभवाचा महामेरू असलेला पुण्याचा सार्वजनिक गणेशोत्सव अवघ्या देशाचे आणि जगाचे आकर्षण बिंदू असतो. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी समाजातील सर्व घटकांना एका सूत्रामध्ये बांधण्यासाठी सुरू केलेल्या या ऐतिहासिक उत्सवाचे पावित्र्य आणि परंपरा जपतानाच येणाऱ्या लाखो भाविकांच्या सुरक्षेची आणि सुविधांची योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक असते. पुण्याच्या आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय तयारीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडलेली उच्चस्तरीय बैठक ही याच दूरदृष्टीची साक्ष देणारी आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, वीजपुरवठा आणि गर्दी व्यवस्थापनाबाबत दिलेले निर्देश अत्यंत समयोचित आणि पुण्याच्या सुवर्ण परंपरेला साजेसे आहेत. देशभरातून आणि परराज्यांतून लाडक्या बाप्पाच्या दर्शनासाठी पुण्यात येणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड असते. ही बाब लक्षात घेता रेल्वे, बस स्थानके आणि प्रमुख मार्गांवर होणारी गर्दी नियंत्रित करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. विविध गणेश मंडळांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणाऱ्या हजारो नागरिकांसाठी स्वतंत्र वाहतूक व पार्किंगचे नियोजन करणे, तसेच मेट्रो प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी केलेले विशेष आराखडे यामुळे शहरवासीयांचा आणि पर्यटकांचा प्रवास सुकर होणार यात शंका नाही. विशेषतः महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी २४ तास पोलिसांची गस्त, साध्या वेशातील पथके आणि पाकीटमारीसारख्या घटना रोखण्यासाठी उचललेली पावले कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. विकासाच्या आणि आनंदाच्या या उत्सवात प्रशासकीय यंत्रणा आणि नागरिक यांच्यातील समन्वय हाच यशस्वी आयोजनाचा पाया असतो. महापालिका आणि पोलीस प्रशासनाने केलेली पूर्वतयारी, खड्डे दुरुस्ती, वैद्यकीय पथकांची उपलब्धता, तसेच विसर्जन घाटांवर चोख स्वच्छता आणि प्रकाशव्यवस्था यांमुळे उत्सव काळात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. लोकमान्य टिळकांनी दिलेल्या विचारांचे जतन करत, उच्च न्यायालयाच्या नियमांचे पालन करून आणि पर्यावरणपूरक व शांतीपूर्ण वातावरणात हा गणेशोत्सव पार पाडणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. प्रशासनाच्या या भक्कम नियोजनामुळे यंदाचा पुणेकरांचा लाडका गणेशोत्सव अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात पार पडेल, असा दृढ विश्वास वाटतो.

## गोमय गणपती पर्यावरण पूर्वक उत्सव साजरा करण्याची संकल्पना करा : नितीन जाधव

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी- गौरक्षक सेना कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने येणाऱ्या 2026 चा गणेश उत्सव हे महाराष्ट्र कृषीप्रधान राज्य आहे या राज्यामध्ये शेतीला सलग्न असणारे उद्योगधंद्याला चालना मिळावी म्हणून पशुसंवर्धन विभागा च्या उद्योग क्षेत्रात कार्य करणाऱ्या उद्योगांना आर्थिक मदत साठी महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन विभागाचे कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाने तसेच महाराष्ट्र गोसेवा आयोग चे राज्यमंत्री दर्जा अध्यक्ष शेखरजी मुंदडा यांच्या पुढाकारातून महाराष्ट्रभर गोमय गणपती पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करा अशी आव्हान केले आहे म्हणून या आव्हानाच्या माध्यमातून जनजागृती गौरक्षक सेना प्रदेश मंत्री गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर हे सोशल मीडियाच्या माध्यमातून गोमय गणपती गोमय गणेश उत्सव प्रत्येकाने आपल्या घरी गणपती गोमय गणेश पर्यावरण पूर्वक गणपती बसवावा कारण आपल्या संस्कृतीमध्ये गाईला खूप महत्त्व आहे महाराष्ट्र सरकारने राज्य व माता म्हणून दर्जा दिलेला आहे आणि कुठेतरी गाय वाचली पाहिजे व संवर्धन झालं पाहिजे हेतूने महाराष्ट्रामध्ये सर्व गोशाळा आहेत त्याच्यामध्ये त्यांना चारा पाण्यासाठी उत्पन्न उपलब्ध होऊ शकते म्हणून गोमय गणपती तयार करत आहेत पण त्याचा विक्री विक्री व्हायला पाहिजे म्हणून शुद्ध देशी गायीच्या गोमूत्र शेणापासून गोमय गणपती पर्यावरण पूर्वक तयार करण्यात येत आहे असा गणपतीची संकल्पना महाराष्ट्रातल्या सर्व गणेश भक्तांनी गोमय गणपती बसवावा व स्थापन करावा प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रत्येक वेगवेगळ्या ठिकाणी गोशाळेमध्ये किंवा गणपती ज्या ठिकाणी असतात अशा ठिकाणी उपलब्ध आहेत म्हणून यावर्षीचा गोमय गणेश उत्सव गोमय साजरा करावा असे आव्हान कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी अध्यक्ष गोप्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्व गणेश भक्तांना गणेश प्रेमी गोमय गणपती साजरा करण्याची संकल्पनेचे आवाहन केले आहे अशी माहिती गोमय गणपती पर्यावरण पूर्वक गणपती जनजागृती प्रमुख गो प्रबोधनकार नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली.

## 'विश्वबंधुत्व पंधरवडा' साजरा करण्याचे 'अमृत'चे आवाहन 'शिकागो भाषण कृती कार्यक्रम' ठरणार प्रमुख आकर्षण

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** स्वामी विवेकानंद यांनी 11 सप्टेंबर 1893 रोजी अमेरिकेतील शिकागो येथे जागतिक धर्म संसदेत केलेल्या ऐतिहासिक भाषणातून दिलेला सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, मानवता, परस्पर सन्मान आणि विश्वबंधुत्वाचा संदेश समाजाच्या विविध घटकांपर्यंत व्यापक स्वरूपात पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने यावर्षीपासून 11 ते 26 सप्टेंबरदरम्यान 'विश्वबंधुत्व पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे या पंधरवड्यात विविध संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन 'अमृत' संस्थेने केले आहे. 'शिकागो भाषण कृती कार्यक्रम' हे या पंधरवड्याचे प्रमुख आकर्षण असून, स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो भाषणातील विचार समजून घेऊन ते दैनंदिन जीवनात आचरणात आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सहभागी संस्थांनी आपल्या स्तरावर स्पर्धा, चर्चासत्रे, व्याख्याने, जनजागृतीपर उपक्रम तसेच मूल्याधिष्ठित कार्यक्रम आयोजित करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच विविध खाजगी आस्थापनांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन 'अमृत'ने केले आहे. प्रत्येक संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रानुसार उपक्रम आयोजित करून विद्यार्थी, युवक आणि नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग वाढवावा, अशी अपेक्षा आहे. या अभियानात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संस्थांनी **https:**//vbd.mahaamrut.org.in/ या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या संस्थांनी आपल्या स्तरावर 'शिकागो भाषण कृती कार्यक्रम' अंतर्गत विविध उपक्रम आयोजित करावेत, असे आवाहन 'अमृत' संस्थेने केले आहे.

# पेपरफुटीचा संताप, दुष्काळाची व्यथा; आंदोलनांचा भडका

### एमपीएससी विद्यार्थ्यांचा आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा; तुकाराम मुंडे, व्ही. राधा यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्याची रोहित पवारांची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या प्रश्नावरून विद्यार्थ्यांचा संताप रस्त्यावर उतरला. आमखास मैदानापासून निघालेला विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत शासन आणि एमपीएससी च्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. मोर्चानंतर दिल्लीगेट परिसरात विद्यार्थ्यांची सभा झाली. यावेळी परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी, परीक्षा वेळापत्रकातील बदल मागे घेणे आणि आयोगाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या मागण्या करण्यात आल्या. नोव्हेंबरमध्येच परीक्षा घेण्याची मागणी वर्ग 'क'ची परीक्षा जानेवारीमध्ये घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांना मान्य नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. परीक्षा नोव्हेंबरमध्येच घेण्यात यावी आणि ती ऑफलाइन पद्धतीने पार पडावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली.शेतकरी आर्थिक संकटात असताना आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी मोठा खर्च करत आहेत. त्यातच परीक्षा लांबणीवर पडल्यास विद्यार्थ्यांच्या तयारीवर तसेच पुढील संधींवर परिणाम होईल, असा मुद्दा आंदोलनकर्त्यांनी मांडला. सण असला तरी परीक्षा देण्यास विद्यार्थी तयार आहेत; त्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय बदलावा, अशी मागणी करण्यात आली.

'फक्त समिती नेमून प्रश्न सुटणार नाही' आमदार रोहित पवार यांनी एमपीएससी च्या कारभारावर टीका करताना केवळ समिती किंवा एसआयटी नेमणे पुरेसे नसल्याचे सांगितले. पैशाच्या जोरावर अपात्र व्यक्तींना शासकीय सेवेत प्रवेश मिळाल्यास त्याचा परिणाम संपूर्ण प्रशासनावर होऊ शकतो, असा दावा त्यांनी केला. पेपरफुटीच्या आरोपांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच एमपीएससी च्या अध्यक्षांचा राजीनामा घेऊन अध्यक्षपदी तुकाराम मुंडे किंवा व्ही. राधा यांच्यासारख्या सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी पवार यांनी केली. मुख्यमंत्री यांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात, असेही त्यांनी सांगितले. 'ईडी लावली तरी मागे हटणार नाही' आपल्या आंदोलनातील सहभागावर होणाऱ्या राजकीय टीकेलाही रोहित पवार यांनी प्रत्युत्तर दिले. शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांच्या न्याय्य मागण्यांसाठी आपण आवाज उठवत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी आपल्या मागे ईडी लावली तरी त्याची पर्वा नसल्याचे पवार म्हणाले. NEETच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाप्रमाणे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनीही जात, पक्ष आणि संघटनांचे भेद बाजूला ठेवून एकत्रितपणे लढा दिल्यास यश मिळू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आयुक्तांना निवेदन; लातूरमध्येही आंदोलन

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सभा झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने विभागीय आयुक्तांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. पुणे, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आणि सातारा येथे आंदोलन झाल्यानंतर आता लातूरमध्येही आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## रस्त्याच्या कामावरून वाद; लोखंडी रॉडने मारहाण करणारे तिघे ताब्यात

### बिडकीन पोलिसांची कारवाई; अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीजवळून घेतले ताब्यात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पैठण तालुक्यातील बाबुळगाव ते नायगव्हाण रस्त्याच्या कामावरून झालेल्या वादात अमय अजित सावे (३५) यांच्यावर लोखंडी रॉडने डोक्यात व माथ्यावर मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी फरार असलेल्या तिघांना बिडकीन पोलिसांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीजवळून ताब्यात घेतले. भालचंद्र ताराचंद सत्तावन्न (३६), संग्राम उर्फ करण अशोक परदेशी (२१) आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा त्यात समावेश आहे.




बाबुळगाव ते नायगव्हाण रोडवर १० सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. खंडेवाडी गावातील काही मुलांनी वाहन अडविल्याची माहिती मिळाल्यानंतर अमय सावे हे साक्षीदारांसह घटनास्थळी गेले होते. त्यावेळी सावे यांच्या वडिलांची घटनास्थळी जमलेल्या लोकांशी रस्त्याच्या कामाबाबत चर्चा सुरू होती. रस्त्याचा प्रश्न सुटलेला असताना वाहने का अडविली जात आहेत, असा जाब विचारण्यात आला. त्यातून दोन्ही लेनच्या कामावरून वाद निर्माण झाला.

वाद वाढल्यानंतर आरोपींनी संगनमत करून अमय सावे यांच्या वडिलांना धक्काबुक्की केली आणि रस्त्यालगतच्या खड्ड्यात ढकलून दिले. वडिलांना झालेल्या प्रकाराबाबत जाब विचारण्यासाठी अमय सावे आरोपींकडे गेले. त्यावेळी आरोपी भालचंद्र सत्तावन्न याने लोखंडी रॉडने त्यांच्या डोक्यात व माथ्यावर वार केले. त्यानंतर संग्राम उर्फ करण परदेशी व विधीसंघर्षग्रस्त बालकाने अमय यांना खाली पाडून हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

या हल्ल्यात अमय सावे यांच्या डोक्याला तसेच डाव्या हाताच्या दंडाला दुखापत झाली. त्यांना सोडविण्यासाठी साक्षीदार पुढे आला असता आरोपींनी त्याच्याशीही धक्काबुक्की केली. घटनेनंतर तिन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

या प्रकरणी अमय सावे यांच्या तक्रारीवरून ११ सप्टेंबर रोजी रात्री १ वाजून ३२ मिनिटांनी बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५६९/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), ११८(१), ११५(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच बिडकीन पोलिसांनी फरार आरोपींचा शोध सुरू केला. उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपींच्या हालचालींचा माग काढत पोलिसांनी शोधमोहीम राबविली. अखेर पोलिस पथकाने आरोपींचा ठावठिकाणा निश्चित करून अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीजवळून तिघांनाही ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्यांमध्ये भालचंद्र ताराचंद सत्तावन्न, संग्राम उर्फ करण अशोक परदेशी आणि १७.५ वर्षांच्या विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या बाबतीत लागू कायदेशीर तरतुदींनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

## पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन' उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.११ सप्टेंबर :** येथील पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय आणि आजीवन अध्ययन विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. "साक्षरता - शाश्वत विकासाचा पाया" या संकल्पनेवर आधारित या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिलीप बिरुटे उपस्थित होते. त्यांनी साक्षरतेचे महत्त्व विशद करताना साक्षरता हा केवळ अक्षरांची ओळख नसून समृद्ध जीवन आणि शाश्वत विकासाचा खरा पाया आहे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भास्करराव टेकाळे होते. त्यांनी साक्षर समाज घडवण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन डॉ. गोविंद फड यांनी केले.

"चला, आपण सर्व मिळून साक्षर भारत बनवूया!" या संकल्पासह कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पात्र नागरिकांनी मतदार नोंदणीची संधी साधावी – जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

छत्रपती संभाजीनगर, दि. 11 (जिमाका) – विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR)-2026 अंतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि. 19, 20, 26 व 27 सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेऊन मतदार यादीत नाव नोंदणी तसेच आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. गौडा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी दि. 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी दि. 30 सप्टेंबर 2026 पर्यंत मुदत आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र नागरिकांना नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी नमुना-6 (Form-6) भरता येईल. मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती, स्थलांतर अथवा अन्य आवश्यक बदलांसाठी नमुना-8 (Form-8), तर अपात्र, मृत, दुबार अथवा अन्य कारणांमुळे नाव वगळण्यासाठी नमुना-7 (Form-7) द्वारे अर्ज करता येईल. दि. 1 ऑक्टोबर 2026 रोजी 18 वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वय पूर्ण करणाऱ्या आणि मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र नागरिकांनी मतदार नोंदणी करून घ्यावी. विशेषतः 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि. 19, 20, 26 व 27 सप्टेंबर रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 6 या वेळेत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत मतदार नोंदणी, दुरुस्ती तसेच नाव वगळण्यासंदर्भातील अर्ज स्वीकारण्यात येतील.

ज्या पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत नाहीत अथवा ज्यांना मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती करावयाची आहे, त्यांनी संबंधित मतदान केंद्रावरील विशेष शिबिरास भेट देऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत.

## जरंडी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे एकदिवसीय वृक्षारोपण शिबिर संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.११ सप्टेंबर



अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगावच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जरंडी येथे एकदिवसीय वृक्षारोपण शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या सुरुवातीला जरंडी गावातून वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा', 'पर्यावरण वाचवा' अशा घोषणा देत जनजागृती केली.यानंतर विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून, प्रत्येकाने वृक्षलागवडीसोबत त्यांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शिबिरादरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांनी गावातील शेतकऱ्यांसोबत शेतात जाऊन संवाद साधला. यावेळी शेती, पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड तसेच ग्रामीण जीवनातील विविध विषयांवर शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील चौधरी होते. प्रमुख उपस्थिती म्हणून जरंडीचे सरपंच दिलीप पाटील, उपसरपंच संजय पाटील व नम्रता जाधव उपस्थित होते. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

समारोप कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिबिरातील आपले अनुभव व मनोगत व्यक्त केले. वृक्षदिंडी, वृक्षारोपण, शेतकऱ्यांशी साधलेला संवाद आणि गावातील विविध उपक्रमांमुळे ग्रामीण जीवन, पर्यावरण संवर्धन व सामाजिक बांधिलकी यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याचे स्वयंसेवकांनी मनोगतात सांगितले.

समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक पारधे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. मनोजकुमार चोपडे यांनी केले.

या एकदिवसीय वृक्षारोपण शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली असून, वृक्षदिंडी व वृक्षारोपणाच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्येही वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाचा सकारात्मक संदेश पोहोचला.

# आश्रमशाळांमध्ये 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियाना'चे आयोजन

### आदिवासी विकास विभागाचा निर्णय; सर्पमित्रांसह तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे होणार

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** आदिवासी विकास विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, तसेच एकलव्य मॉडेल निवासी शाळा व वसतिगृहे प्रामुख्याने डोंगराळ आणि वनक्षेत्रालगतच्या भागात आहेत. त्यामुळे या ठिकाणी विद्यार्थ्यांचा साप, विंचू तसेच इतर वन्यजीवांशी संपर्क येण्याची शक्यता अधिक असते. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आदिवासी विकास विभागाने 19 ते 26 सप्टेंबर 2026या कालावधीत 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान' आयोजित करण्यात आले आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षितता ही विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियानामुळे दुर्गम भागातील आश्रमशाळांमधील हजारो विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये सर्पदंशाबाबत जनजागृती होईल. आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद देऊन प्राण वाचविण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल," असे आदिवासी विकास विभागाचे आयुक्त (प्र.) गोपीचंद कदम यांनी सांगितले.

राज्य शासनाने १८ ऑगस्ट २०२६ रोजी सर्पदंश हा अधिसूचित आजार म्हणून घोषित केला आहे. त्यामुळे सर्पदंशाच्या घटनांची वेळेवर नोंद व अहवाल सादर करणे, त्याचे निरीक्षण करणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे तसेच सापाच्या विषावरील लस / इंजेक्शनची उपलब्धता आणि साठवणूक केंद्रांची माहिती अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. आदिवासी विकास विभागाने विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि आरोग्य यांना प्राधान्य देत हे अभियान हाती घेतले आहे. अभियानाच्या माध्यमातून सर्पदंश प्रतिबंध, सुरक्षित वर्तन, आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद आणि बाधित व्यक्तीस वेळेवर वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्यावर भर देण्यात येणार आहे.

अभियानांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, तसेच एकलव्य मॉडेल निवासी शाळा व वसतिगृहांमध्ये स्थानिक सर्पमित्र, सर्पतज्ज्ञ, आरोग्य विभाग आणि वन विभागाच्या सहकार्याने किमान एक तासाचे विशेष जनजागृती सत्र आयोजित करण्यात येणार आहे.

या सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना साप आढळल्यास सुरक्षित अंतर राखणे, शांतपणे त्या ठिकाणापासून दूर जाणे, सर्पदंश झाल्यास प्राथमिक स्वरूपात घ्यावयाची काळजी, सर्पदंशाबाबतचे अंधश्रद्धा व गैरसमज दूर करणे, सापाला पकडण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न न करणे आदींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच सर्पदंश झाल्यास घाबरून न जाता बाधित व्यक्तीची हालचाल कमी ठेवणे आणि तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल करणे याबाबतही माहिती दिली जाणार आहे.

याशिवाय आदिवासी विकास विभागाच्या डिजिटल स्टुडिओच्या माध्यमातून सर्पदंश प्रतिबंध, सुरक्षित वर्तन आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद याबाबत तज्ज्ञांची मार्गदर्शनपर सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जनजागृती सत्रादरम्यान कोणताही जिवंत साप शाळेच्या परिसरात आणून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करू नये, असे सक्त निर्देश विभागाने दिले आहेत.

दर तीन महिन्यांनी आपत्कालीन माहिती अद्ययावत

आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, वसतिगृहांचे अधीक्षक आणि परिचारिका यांना आपत्कालीन संपर्कांची माहिती दर तीन महिन्यांनी अद्ययावत करावी लागणार आहे. यामध्ये जवळच्या आरोग्य संस्थेचे नाव व संपर्क क्रमांक एएसव्ही उपलब्ध किंवा साठवणूक केलेल्या आरोग्य संस्थेची माहिती, आपत्कालीन वाहतूक व्यवस्था व संपर्क क्रमांक तसेच स्थानिक सर्पमित्रांचे संपर्क क्रमांक यांचा समावेश असेल.

# सर्जा-राजाचा पोळा; पावसाचा कानाडोळा! दुष्काळाच्या सावटात बळीराजाने जड अंत:करणाने साजरा केला सण; 75 टक्के खरीप पिके वाया



**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** लाडक्या सर्जा-राजाचा पोळा सण गुरुवारी (दि. १० सप्टेंबर) बळीराजाने जड अंतःकरणाने साजरा केला. गेल्या सव्वा महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने कपाशी, सोयाबीन, तूर, मूग, उडीद यासह खरीप पिके करपली आहेत. बहुतांश भागात जमिनीतील ओलावा संपल्याने सुमारे ७५ टक्के खरीप पिकांचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे नेहमी उत्साहात साजरा होणाऱ्या पोळ्यावर यंदा दुष्काळाची छाया होती. गावोगावी सर्जा-राजाला सजवून पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यात आली; मात्र सणाचा नेहमीचा जल्लोष आणि बाजारातील गर्दी यंदा जाणवली नाही.

पोळ्याच्या आदल्या दिवशी खांदेमाळणीचा विधी झाला. मात्र, शेत-शिवारातील ओढे, नदी-नाले आणि तलाव कोरडे असल्याने अनेक ठिकाणी घरातून बादलीने पाणी आणून बैलांना आंघोळ घालावी लागली. पिकांची अवस्था पाहता बळीराजाच्या चेहऱ्यावरही सणाचा आनंद दिसत नव्हता. पिके उत्पादनाच्या निर्णायक टप्प्यात असतानाच पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कपाशी, तूर आणि ऊस पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे.

शेतकऱ्यांसाठी श्रावणी पोळा हा वर्षभरातील महत्त्वाचा सण. त्यामुळे आर्थिक अडचणी असूनही शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा-राजाला रंग, गोंडे, झूल आणि घुंगरमाळांनी सजविले. ग्रामदैवतांच्या मंदिरांना प्रदक्षिणा घालून घरोघरी सुवासिनींनी औक्षण केले आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून बैलांचे पूजन केले. मात्र, पूर्वीप्रमाणे मानाच्या बैलाची मिरवणूक आणि मोठा जल्लोष अनेक गावांत दिसून आला नाही.

**बैलांची संख्याही घटली**

शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे बैलांची संख्याही मोठ्या प्रमाणावर घटली आहे. आठ-दहा बैलांची शेती असणाऱ्या शेतकऱ्यांकडे आता अवघी एक बैलजोडी उरल्याचे चित्र आहे. तरीही उपलब्ध बैलांचे मनोभावे पूजन करून शेतकऱ्यांनी आपली परंपरा जपली. पैठण तालुक्यातील लोहगाव येथील विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन रावसाहेब बोरुडे-पाटील यांनीही यंदा शेतकऱ्यांनी साधेपणाने पोळा साजरा केल्याचे सांगितले.

**बाजारपेठेवरही मंदीची छाया**

बैलांच्या सजावटीसाठी रंग, गोंडे, झूल, वेसण आणि घुंगरमाळांनी बाजारपेठ सजली होती. मात्र, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींमुळे खरेदीचा उत्साह कमी राहिला. त्यामुळे व्यापाऱ्यांचेही आर्थिक गणित बिघडले. अनेक शेतकऱ्यांनी नवीन साज खरेदी करण्याऐवजी जुनाच साज वापरून पोळा साजरा केला.

**नावांतून दिसली सर्जा-राजाशी नाळ**

दुष्काळाचे सावट असतानाही सर्जा-राजाप्रति बळीराजाची असलेली माया पोळ्याच्या दिवशी दिसून आली. बैलांच्या पाठीवर नंद्या-महाद्या, ढवळ्या-पवळ्या, धुळ्या-चपळ्या, हिरो, दुशिंग्या, लक्ष्या-चिक्शा अशी नावे रंगविण्यात आली होती. शिंगांना रंग, फुगे आणि अंगावर झूल असा साज चढविण्यात आला होता. पाऊस नाही, पीक नाही, हातात पैसा नाही; तरीही सर्जा-राजाचा सण मात्र बळीराजाने परंपरेनुसार जपला.

## शिवना येथे बैल पोळा उत्साहात साजरा



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथे शेतकऱ्यांचा पारंपरिक व जिव्हाळ्याचा सण असलेला बैल पोळा मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला. शिवाई देवी मंदिर परिसरात पोळ्यानिमित्त बैलांची सजावट करून पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यात आली.

पोळ्याच्या दिवशी गावातील मानाचा बैल अनिल दशरथ यांच्या हस्ते शिवाई देवी मंदिरात नेण्यात आला. यावेळी देवीचे दर्शन घेऊन बैलाची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने पोळा सणाचा उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी परिसरात शेतकरी व नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

सणाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच उत्सव शांततेत पार पडावा, यासाठी अजिंठा पोलिस ठाण्याच्या वतीने चौक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलिसांच्या उपस्थितीमुळे पोळा उत्सव शांततेत पार पडला.

यावेळी गावातील शेतकरी, नागरिक व तरुणांची मोठी उपस्थिती होती. पारंपरिक वेशभूषा, सजविलेले बैल आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे शिवना येथे पोळा सणाला विशेष रंगत आली.

## शिवराज मोरे यांच्यावरील हल्ल्याचा युवक काँग्रेसकडून तीव्र निषेध

**छत्रपती संभाजीनगर :** नागपूर येथे आंदोलनादरम्यान महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज दादा मोरे यांच्यासोबत झालेल्या कथित मारहाणीच्या घटनेचा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या घटनेप्रकरणी संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करून त्याला तत्काळ निलंबित करावे, या मागणीचे निवेदन युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव इरफान इब्राहिम पठाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, नागपूर येथे आंदोलन सुरू असताना पोलीस प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांना विरोध करण्यात आला. यावेळी एका पोलीस अधिकाऱ्याने युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांचा गळा दाबून त्यांच्याशी मारहाण केली. या घटनेत त्यांच्या गळ्यावर दुखापत झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यावेळी इरफान इब्राहिम पठाण म्हणाले, "लोकशाहीमध्ये आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून परिस्थिती हाताळण्याऐवजी जर पोलीस प्रशासनाकडूनच बळाचा वापर होत असेल, तर हा गंभीर विषय आहे. पोलीस प्रशासन जनतेचा जीव वाचविण्यासाठी आहे की जीव धोक्यात घालण्यासाठी, असा प्रश्न या घटनेमुळे निर्माण झाला आहे. प्रदेशाध्यक्ष शिवराज दादा मोरे यांच्याशी झालेल्या या कथित गैरवर्तनाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करावी." "लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी प्रशासनाची आहे. या प्रकरणात योग्य ती कारवाई झाली नाही, तर युवक काँग्रेसच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल," असा इशाराही इरफान पठाण यांनी दिला.

## शिंगीच्या विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासह करिअरची दिशा



**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** स्वसंरक्षणाचे धडे, पर्यावरण संवर्धनाचा संदेश, पुस्तकांशी मैत्री आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी करिअर मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांतून शिंगी येथील संत तुकाराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच आत्मविश्वास आणि भविष्यातील वाटचालीची दिशा मिळाली. रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर एलिट, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ आणि विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रभाव, प्रेरणा आणि कृतीचा एक दिवस' हा उपक्रम उत्साहात पार पडला.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत तुकाराम विद्यालयात आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा घेण्यात आली. यासोबतच कंपोस्ट निर्मिती आणि प्लास्टिकमुक्त शाळेचा संदेश देत पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. पुस्तक वाटप व पुस्तकदानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्पर्धात्मक परीक्षांची तयारी, उपलब्ध संधी आणि करिअरच्या विविध पर्यायांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

रोटरी युवा नेतृत्व पुरस्काराच्या (RYLA) माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सामाजिक बांधिलकी विकसित करण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे शिक्षणाच्या चौकटीबाहेर जाऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा हा उपक्रम ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल होते. यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष तथा शाळेचे पालक विवेकजी हंबर्डे, सचिव निवृत्ती पाटील गावंडे, विश्वस्त डॉ. प्रदीप जब्दे, माजी जिल्हा परिषद सदस्य मधुकर वालतुरे, रोटरी क्लबच्या अध्यक्ष डॉ. माधुरी जोशी, सचिव डॉ. अशोक देवरे, खजिनदार सतीश जोशी, प्रकल्प प्रमुख अंजली भालचंद्र, माधुरी सांगवीकर आणि माजी मुख्याध्यापक विठ्ठल वायाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रकल्प टीममधील स्वाती स्मार्थ, विश्वास जोशी, शिवम घोंगे, रामप्रसाद कुंभार, अनिकेत नरोडे व अस्मिता मुळे यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले. मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे, शालेय समितीचे सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## चपळगावकर कुटुंबीयांकडून 15 हजार पुस्तके देण्याचा निर्णय



**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांना पुढे नेत 'भूदानातून पुस्तकदानाकडे... पुस्तकदानातून ज्ञानदानाकडे!' या संकल्पनेतून एमजीएम विद्यापीठाने पुस्तकदानाचा उपक्रम हाती घेतला आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, चिंतनाची सवय आणि ज्ञानाची देवाणघेवाण वाढविण्याबरोबरच समाजात ज्ञानदानाची संस्कृती रुजविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाचे आवाहन केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी २४ तासांपैकी किमान एक तास वाचनासाठी दिला पाहिजे. प्रत्येकाने स्वतःचे स्वतंत्र ग्रंथालय उभारावे. वाचनातून चिंतन आणि मननाची सवय विकसित होते आणि त्यातून व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होत जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचे विचार व साहित्य विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचावे, असे त्यांनी सांगितले.

आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून सामाजिक समता, ग्रामविकास, अहिंसा आणि सर्वोदयी विचारांचा प्रसार केला. त्यांच्या विचारांमध्ये ज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि मानवकल्याणाला महत्त्वाचे स्थान होते. याच विचारांना पुढे नेत पुस्तकदानाच्या माध्यमातून ज्ञानदानाची चळवळ उभी करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

दरम्यान, माजी न्यायमूर्ती, ज्येष्ठ विचारवंत, लेखक आणि अभ्यासक नरेंद्र चपळगावकर यांच्या वैयक्तिक संग्रहातील सुमारे १५ हजार पुस्तके एमजीएम विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयास दान करण्याचा निर्णय नंदिनी चपळगावकर यांनी जाहीर केला. विविध विषयांवरील या पुस्तकांमुळे विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधकांना अभ्यास व संशोधनासाठी समृद्ध संदर्भसाहित्य उपलब्ध होणार आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून नरेंद्र चपळगावकर यांचा समृद्ध वैचारिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणार आहे.

कार्यक्रमाला विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती. प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई आणि अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रिहाना सय्यद यांनी केले, तर आभार डॉ. रविंद्र देशमुख यांनी मानले.

## पावसासाठी शिवना येथे नमाज-ए-इस्तिस्का; रहमतच्या पावसासाठी अल्लाह तआलाकडे विशेष दुआ

### ईदगाह मैदानावर मोठ्या संख्येने मुस्लिम समाजबांधवांची उपस्थिती

**शिवना, ता. सिल्लोड :** परिसरात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असून शेतकरी चिंतेत आहेत. पिकांना सध्या पावसाची अत्यंत आवश्यकता असल्याने रहमतचा पाऊस बरसावा, शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी मुस्लिम समाजाच्या वतीने शिवना येथील ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्काचे आयोजन करण्यात आले.

शुक्रवारी दुपारी ३ वाजता ईदगाह मैदानावर मोठ्या संख्येने मुस्लिम समाजबांधव उपस्थित होते. यावेळी सामूहिकरीत्या नमाज अदा करण्यात आली. नमाजेनंतर अल्लाह तआलाकडे रहमतच्या पावसासाठी विशेष दुआ करण्यात आली.

पावसाअभावी परिसरातील शेतीवर विपरीत परिणाम होत असून खरीप पिकांच्या वाढीसाठी सध्या पावसाची नितांत गरज आहे. या पार्श्वभूमीवर पावसासाठी अल्लाह तआलाकडे प्रार्थना करण्याच्या उद्देशाने नमाज-ए-इस्तिस्काचे आयोजन करण्यात आले. मुस्लिम समाजबांधवांनी या धार्मिक उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामूहिक नमाज अदा केली.

नमाज-ए-इस्तिस्कानंतर करण्यात आलेल्या विशेष दुआमध्ये शिवना तसेच परिसरात चांगला व पुरेसा पाऊस पडावा, दुष्काळसदृश परिस्थिती दूर व्हावी, शेतकऱ्यांच्या पिकांना नवसंजीवनी मिळावी, पशुधन व नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये आणि संपूर्ण परिसरात सुख-समृद्धी नांदावी, यासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. यावेळी हाफिज मौलाना अय्यूब, मुफ्ती मोहसिन, हाफिज रियाज, हाफिज जलील कुरेशी, मुफ्ती मुनावर, दौलत मौलाना,हाफिज जुबेर, मोहसिन हाफिज, सुभान मौलाना, हाफिज अकील,हाफिज जुनैद,हाफिज रईस, एजाज मौलाना, यांच्यासह मुस्लिम समाजातील मान्यवर व समाजबांधव उपस्थित होते.

पावसाअभावी शेतातील पिकांच्या वाढीवर परिणाम होत असून आगामी काळात पुरेसा पाऊस न झाल्यास शेतीचे मोठे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर शिवना येथे आयोजित सामूहिक नमाज-ए-इस्तिस्कामध्ये नागरिकांनी एकजुटीने सहभागी होत पावसासाठी अल्लाह तआलाकडे दुआ केली.

## प्रभावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा 7 वा वर्धापनदिन उत्साहात साजरा



**बिडकीन, दि. ११ सप्टेंबर :** पैठण तालुक्यातील चितेगाव येथील प्रभावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., चितेगाव यांचा ७ वा वर्धापनदिन शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रभावती पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उत्तम शिंदे, उपाध्यक्ष रामभाऊ गिधाने , संचालक नंदू कुमार गिधिने,यांच्या हस्ते सत्यनारायण पूजन करून करण्यात आली. यावेळी अध्यक्ष व उपाध्यक्ष पतसंस्थेचे सर्व सभासद ,संचालक, खातेदार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी पतसंस्थेला वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उत्तम शिंदे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. पतसंस्थेचे व्यवस्थापक व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी; ॲनिमियाचीही चाचणी

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**तिसगाव :** किशोरवयीन मुलींच्या आरोग्याची काळजी, ॲनिमियाचे वेळेत निदान आणि मासिक पाळीबाबत जनजागृती करण्यासाठी तिसगाव येथील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी व ॲनिमिया चाचणी शिबिर घेण्यात आले. एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सीएसआर प्रकल्पांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.



शिबिरात शाळेतील किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच हिमोग्लोबिन (एचबी) तपासणी करून ॲनिमियाचे परीक्षण करण्यात आले. यावेळी मुलींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता, संतुलित आहार आणि लोहयुक्त पदार्थांचे सेवन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ॲनिमिया टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहितीही देण्यात आली. किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, आजारांचे वेळेत निदान करणे तसेच मासिक पाळीबाबतचे गैरसमज दूर करून आरोग्यदायी सवयी विकसित करणे हा उपक्रमाचा उद्देश होता.

या वेळी प्रकल्प व्यवस्थापक हरीश लालकोट, कार्यक्रम समन्वयक सचिन लिमकर, सारिका गवळी यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षकवृंद तसेच एचजी फाउंडेशन व संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीच्या प्रकल्प पथकाने सहकार्य केले.

## गणेश चतुर्थी विक्रेत्यांच्या सहभागात वाढ

**मुंबई :** यंदाच्या गणेश चतुर्थीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र हा मीशोच्या प्रमुख सणासुदीच्या बाजारपेठांपैकी एक ठरला आहे. राज्यात मुंबई आणि पुणे या सणासुदीच्या खरेदीसाठीच्या प्रमुख बाजारपेठा ठरल्या. विशेष म्हणजे, सणासुदीची ऑनलाइन खरेदी केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित न राहता लहान शहरांमध्येही मोठ्या प्रमाणात विस्तारल्याचे दिसून आले. देशभरातील मीशोवरील गणेश चतुर्थीच्या एकूण ऑर्डर्सपैकी तब्बल ५३% ऑर्डर्स टियर-४ बाजारपेठांमधून आल्या.

## जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या बांधावर सुधारित रेशीम उत्पादन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक

### 'मेरा रेशम मेरा अभिमान–2.0'अंतर्गत टाकळी कु., शेवडी आणि फत्तूनाईक तांडा येथे आयोजन



**हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी**

**परभणी:** जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळून आर्थिक स्तर उंचावण्यासाठी 'मेरा रेशम मेरा अभिमान–२.०' राबविण्यात येत आहे. या अंतर्गत टाकळी कुंभकर्ण, शेवडी आणि फत्तूनाईक तांडा येथे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास जिल्हा रेशीम कार्यालयाचे क्षेत्र सहायक श्री. पी. भंडारे, तांत्रिक सहायक आर. एल. मुंडे, श्री. वाघ, तसेच भागवत इघारे यांच्यासह परिसरातील रेशीम उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणावर यावेळी उपस्थित होते. शेतकऱ्यांना रेशीम उत्पादनातील आधुनिक व शास्त्रीय तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती देऊन त्याचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमात संशोधन विस्तार केंद्राचे संयुक्त संचालक श्री. ए. एल. जाधव यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व, माती परीक्षणाच्या आधारे खत व्यवस्थापन आणि तुती पिकातील शास्त्रीय छाटणी तंत्रज्ञान याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. माती परीक्षण करून उपलब्ध अन्नद्रव्यांची स्थिती समजून घेणे आणि त्यानुसार पिकाच्या गरजेनुसार खतांचा संतुलित वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. संतुलित खत व्यवस्थापनामुळे अनावश्यक खतांचा खर्च कमी करून तुती पानांचे उत्पादन व गुणवत्ता सुधारण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी तुती पिकाच्या शास्त्रीय छाटणीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. छाटणीची योग्य वेळ, छाटणीची उंची, छाटणीची पद्धत तसेच छाटणीनंतर करावयाचे व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दाखवून माहिती देण्यात आली. योग्य पद्धतीने छाटणी केल्यास तुतीची नवीन जोमदार वाढ होऊन रेशीम किड्यांसाठी आवश्यक दर्जेदार व पोषक पाने उपलब्ध होतात. त्याचा परिणाम रेशीम किड्यांची वाढ, कोषाची गुणवत्ता आणि कोष उत्पादनावर होतो, असे श्री. जाधव यांनी सांगितले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या रेशीम संशोधन विभागाचे डॉ. संजोग बोकन यांनी रेशीम किड्यांच्या शास्त्रीय संगोपन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. रेशीम किड्यांच्या संगोपनादरम्यान स्वच्छता, निर्जंतुकीकरण, योग्य तापमान व आर्द्रता व्यवस्थापन तसेच किड्यांना योग्य व दर्जेदार तुती पाने उपलब्ध करून देण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

विशेषतः उझी माशीचा प्रादुर्भाव, त्याची लक्षणे व प्रभावी नियंत्रणाच्या उपाययोजना तसेच उझी माशीच्या नियंत्रणासाठी जैविक नियंत्रण पद्धती, परजीवी कीटकांचा वापर, संगोपनगृहाची स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाययोजना यांचा योग्य पद्धतीने अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले. रेशीम किड्यांचे नुकसान टाळण्यासाठी प्रादुर्भावाची सुरुवातीच्या अवस्थेतच ओळख करून वेळेवर नियंत्रण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

रेशीम उद्योगाच्या विकासासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध रेशीम विकास योजना, अनुदान योजना व शासकीय सुविधांची माहिती शेतकऱ्यांना देत पात्र शेतकऱ्यांनी उपलब्ध योजनांचा लाभ घेऊन तुती लागवड, रेशीम किड्यांचे संगोपन आणि रेशीम उत्पादनामध्ये आवश्यक सुधारणा करावी, असे आवाहन सागर मिसाळ यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांनी माती परीक्षण, खत व्यवस्थापन, तुती छाटणी, तुती पानांची गुणवत्ता, उझी माशी नियंत्रण, रेशीम किड्यांचे संगोपन आणि शासकीय योजनांबाबत विविध प्रश्न विचारले. उपस्थित तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देऊन आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन केले. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या प्रत्यक्ष शेतीतील अडचणींवर शास्त्रीय उपाययोजना समजून घेण्याची संधी मिळाली.

या तंत्रज्ञान प्रात्यक्षिक कार्यक्रमामुळे परिसरातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक रेशीम उत्पादन तंत्रज्ञानाची माहिती आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाचा लाभ मिळाला. 'मेरा रेशम मेरा अभिमान–२.०' या उपक्रमाच्या माध्यमातून रेशीम उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचवून शास्त्रीय पद्धतीने रेशीम उत्पादन करण्यास प्रोत्साहन मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

### छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांची गोवंश तस्करी व अवैध कत्तलीविरोधात 'झिरो टॉलरन्स' धडक कारवाई

# 798 गोवंश जनावरांची सुटका, 150 गुन्हे दाखल आणि 5 कोटींहून अधिकचा मुद्देमाल जप्त


हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

जिल्ह्यात चोरट्या मार्गाने अवैधरित्या होणारी गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, अवैध कत्तल, गोमांसाची तस्करी तसेच प्राण्यांवरील क्रूरतेशी संबंधित गुन्ह्यांविरुद्ध ग्रामीण पोलिसांनी 'झिरो टॉलरन्स' कडक धोरण अवलंबले आहे. जिल्ह्यात गोवंश तस्करांवर आणि अवैध कत्तलखान्यांवर सडकून कारवाई करण्यात येत असून, जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत ग्रामीण पोलिसांनी १५० गुन्हे दाखल करत ३०० आरोपींविरुद्ध कारवाई केली आहे. या धडक मोहिमेत एकूण ७९८ गोवंश जनावरांची सुटका करून त्यांना अधिकृत गोशाळांमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे. या विशेष कारवायांदरम्यान २४ किलो २४६ ग्रॅम गोमांस, गुन्ह्यात वापरलेली ११४ वाहने असे ५ कोटी ५९ लाख २२ हजार ७१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत अवैध चालणारे अनेक गोवंश कत्तलखाने देखील पाडून जमीनदोस्त करण्यात आले आहेत.

**खुलताबादमध्ये अवैध गोवंश कत्तलखान्यावर छापा; ४७ गोवंश व ४ वाहने जप्त**

खुलताबाद तालुक्यातील माटेगाव येथे अजिम शेख याने आपल्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये गोवंश जनावरे डांबून चोरट्या मार्गाने कत्तल चालविल्याची गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे ११ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे पाच वाजता खुलताबाद पोलिसांनी त्या भागात सापळा रचून अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान काही आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले, तर पोलिसांनी चार जणांना शिताफीने ताब्यात घेतले. अजिम बाबु शेख (रा. माटरगाव), मोईन रज्जाक कुरेशी, अनिस अजिज कुरेशी आणि वाजीद अजिज कुरेशी (सर्व रा. समतानगर, छत्रपती संभाजीनगर) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत. याठिकाणी कारवाईत ४२ जिवंत गोवंश आणि ५ कत्तल केलेल्या अवस्थेतील अशा एकूण ४७ गोवंश जनावरांसह



चार वाहने जप्त करण्यात आली. एकूण ४२ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल या कारवाईत जप्त करण्यात आला असून, खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि ग्रामपंचायत माटरगाव यांच्या देखरेखीखाली हा संपूर्ण अवैध कत्तलखाना पूर्णपणे पाडून उध्वस्त करण्यात आला आहे.

**सिल्लोड शहर पोलिसांची कारवाई; २८ गोवंश जनावरांची सुटका व ३४ लाखांचा मुद्देमाल जप्त**

दुसऱ्या एका कारवाईत, ९ सप्टेंबर २०२६ रोजी सिल्लोड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ईदगाहनगर भागातून एका कंटेनरमधून (क्र. MH-46-BB-2052) गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सिल्लोड शहर ते भराडी जाणाऱ्या रोडवरील ईदगाह कमानीजवळ पोलिसांनी नाकाबंदी केली असता, चालकाने वाहन न थांबवता पळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलीस पथकाने शिताफीने तो कंटेनर ईरास्कुलजवळ अडवला. तपासणी केली असता, त्या कंटेनरमध्ये २८ गोवंश बैल अत्यंत अपुऱ्या जागेत, आखूड दोऱ्यांनी बांधून व चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता क्रूरपणे कोंबून नेले जात असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सर्व २८ गोवंश जनावरांची सुटका करून त्यांना शासनमान्य गोशाळेत सुरक्षित हलविले. या कारवाईत कंटेनर व जनावरे मिळून ३४ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी शेख शगिर शेख शब्बीर (रा. सिल्लोड) या चालकाला ताब्यात घेण्यात आले असून, इतर दोन आरोपी फरार आहेत.

# परभणी जिल्ह्यात आरोग्य सेवांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करा : मेघना बोर्डीकर

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी, :** जिल्ह्यातील नागरिकांना अधिक प्रभावी, दर्जेदार व वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाने अधिक गतिमानतेने काम करावे, अशा सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी दिल्या. त्यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेच्या सभागृहात आरोग्य विभागाची आढावा बैठक घेण्यात आली.

बैठकीत जिल्ह्यातील विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे, जागतिक आरोग्य संघटनेचे विभागीय लसीकरण अधिकारी डॉ. मुजीब सय्यद, विभागीय क्षयरोग अधिकारी डॉ. कौस्तुभ दास गुप्ता, सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. कदम, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रावजी सोनवणे, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. शिंदे आणि वैद्यकीय अधिकारी क्षयरोग डॉ. केंद्रीकर यांनी विविध



विषयांवर मार्गदर्शन केले.

**क्षयरोग निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना**

'क्षयरोगमुक्त भारत' या उद्दिष्टाच्या दिशेने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अधिक प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. क्षयरोगाची लक्षणे असलेल्या नागरिकांची तपासणी, एक्स-रे, वेळेत निदान, प्रतिबंधात्मक औषधोपचार तसेच रुग्णांना आवश्यक पोषण आहार उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला. क्षयरोगाचे रुग्ण वेळेत शोधून त्यांच्यावर योग्य उपचार होण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक सक्रियपणे काम करावे, असे निर्देश देण्यात आले.

आरोग्य राज्यमंत्र्यांचे सल्लागार डॉ. आनेराव यांनीही प्रभावी आरोग्य सेवा देण्याबाबत सूचना केल्या. यावेळी त्यांनी आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचा मोबाईल संदेश उपस्थितांना दिला.

**नियमित नेत्र तपासणीसह नेत्रदानाबाबत जनजागृती**

नागरिकांनी डोळ्यांची योग्य काळजी घेण्याबरोबरच नियमित नेत्र तपासणी करून घ्यावी, याबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच नेत्रदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवून नेत्रदानाबाबत मार्गदर्शन व जनजागृती करण्यावरही भर देण्यात आला.

**'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाला गती**

'माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान' प्रभावीपणे राबविण्याबाबतही बैठकीत सूचना देण्यात आल्या. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्य तपासणीला प्राधान्य देण्यात येणार आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह तसेच विविध प्रकारच्या कर्करोगाची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, १०० दिवसांत या तपासण्या पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# तृतीयपंथीयांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

### सामाजिक न्याय विभाग व सप्तरंग सेवाभावी संस्थेचा संयुक्त उपक्रम

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** तृतीयपंथीयांसाठी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या कल्याणकारी विविध योजनांचा लाभ घेऊन तृतीयपंथीयांनी उत्कर्ष साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, परभणी आणि सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'तृतीयपंथीयांचे हक्काचे संरक्षण व कल्याण योजना' अंतर्गत तृतीयपंथीयांसाठी कार्यशाळा व आरोग्य शिबिराचे आयोजन आज जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून जिल्हाधिकारी श्री. चव्हाण बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सप्तरंग सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष डॉ. सान्वी जेठवाणी, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त राजू एडके, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी ईप्पर, जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, पोलीस निरीक्षक दीपक बोरसे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. समाजातील प्रत्येक घटकाला समान आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षितता आणि सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे. तृतीयपंथीय समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास आणि सामाजिक सुरक्षितता या क्षेत्रांत सातत्याने प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन तृतीयपंथीयांनी स्वावलंबी होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यावेळी म्हणाले.

# स्मार्ट सिटी बसच्या सुरक्षेसाठी १५ दिवसांचे 'सेफ्टी ड्राईव्ह'

### वायरिंगला आग, टायर निखळण्याच्या घटनांची आयुक्त अमोल येडगे यांनी घेतली गंभीर दखल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** स्मार्ट सिटी बसच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्यानंतर महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी बसच्या तांत्रिक आणि यांत्रिक सुरक्षेची काटेकोर तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. जाधवमंडी येथील स्मार्ट सिटी बस डेपोत पाहणी करून त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी प्रत्येक बसची चेकलिस्टनुसार तपासणी करूनच ती मार्गावर सोडण्याचे आदेश त्यांनी दिले.



मागील दोन आठवड्यांत रेल्वे स्टेशन परिसरात स्मार्ट सिटी बसच्या वायरिंगला आग लागून धूर निघण्याची घटना घडली होती. तसेच खुलताबाद घाट परिसरात धावत्या बसचे टायर निखळल्याची घटना घडली. या दोन्ही घटनांची गंभीर दखल घेत आयुक्तांनी पुढील १५ दिवस विशेष 'सेफ्टी ड्राईव्ह' राबविण्याचे निर्देश दिले.

या मोहिमेत प्रत्येक बस मार्गावर सोडण्यापूर्वी ग्रीसिंग, नट-बोल्ट, टायरची स्थिती, हवेचा दाब तसेच अन्य महत्त्वाच्या यांत्रिक घटकांची तपासणी करावी. बॅटरी व वायरिंगची जोडणी, लूज कनेक्शन किंवा अन्य तांत्रिक बिघाड आहे का, याचीही डेपो स्तरावर नियमित तपासणी करावी, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

चेकलिस्टमधील सर्व बाबी तपासल्याशिवाय चालकाने बस डेपोतून बाहेर काढू नये, अशी जबाबदारी चालकांवरही निश्चित करण्यात आली आहे. प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण करणाऱ्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी सुरक्षेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

**१७ सप्टेंबरपूर्वी ३४ ई-बसेसची चाचणी**

इलेक्ट्रिक बस ताफ्यातील ३४ बसेसची तांत्रिक चाचणी १७ सप्टेंबरपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. बस चार्ज करून तिची चाचणी घेण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेऊन नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. आगामी काळात दाखल होणाऱ्या २७ नवीन पीएम ई-बसेससाठी उपलब्ध चार्जर सुसंगत आहेत का, तसेच चार्जिंग क्षमता आणि विद्युत यंत्रणा योग्य आहे का, याची आगाऊ तपासणी करण्यासही सांगण्यात आले.

**चालकांच्या पात्रतेचीही होणार तपासणी**

बस चालकांची नियुक्ती करताना बॅच अथवा बिल्ला, वैध वाहन चालविण्याचा परवाना, किमान तीन वर्षांचा वाहन चालविण्याचा अनुभव आणि वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्राची काटेकोरपणे पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पात्र आणि सक्षम चालकांचीच नियुक्ती करण्याची दक्षता घेण्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

# गणेशोत्सव शांततेत साजरा करा; डीजेवर बंदी, नियमांचे काटेकोर पालन करा

### जिंतूर येथे तालुकास्तरीय शांतता समिती बैठकीत प्रशासनाचे आवाहन

**जिंतूर, दि. 11 :** आगामी श्री गणेशोत्सव 2026 च्या पार्श्वभूमीवर जिंतूर पोलीस प्रशासनाच्या वतीने लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे तालुकास्तरीय शांतता समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी गणेशोत्सव शांततेत, सौहार्दपूर्ण वातावरणात आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवून साजरा करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. तसेच यंदाचा गणेशोत्सव 'डीजे मुक्त' साजरा करण्याचा निर्णय बैठकीत स्पष्ट करण्यात आला.






बैठकीत बोलताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, जिंतूर शहरात दरवर्षी 17 ते 18 गणेश मंडळांना परवानगी दिली जाते. मात्र प्रत्यक्षात 10 ते 12 मंडळेच सक्रिय असतात. शांतता समितीच्या बैठकीला गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षेपेक्षा कमी असल्याबद्दल खंतही व्यक्त करण्यात आली.

पोलीस प्रशासनाच्या वतीने गणेशोत्सव हा केवळ एका भागापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशात श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा उत्सव असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे उत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, ध्वनी प्रदूषण टाळावे, शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे आणि आवश्यक परवानग्या वेळेत घ्याव्यात, असे आवाहन करण्यात आले.

तसेच डीजेच्या वापरामुळे ध्वनी प्रदूषण वाढून नागरिकांना त्रास होतो. न्यायालयीन आदेश व शासनाच्या नियमांचे पालन करण्यासाठी यंदाचा गणेशोत्सव डीजे मुक्त ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. मंडळांनी पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य देऊन सामाजिक सलोखा जपावा, असेही प्रशासनाने नमूद केले.

बैठकीस परभणीचे पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, पोलिस निरीक्षक नामदेव रेड्डी, तहसीलदार शितल कच्छवे, आचार्य महेश चैतन्य महाराज, नायब तहसीलदार प्रशांत राखे तसेच बोरी, बामणी व चारठाणा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील नागरिक, गणेश भक्त, व्यापारी बांधव आणि विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुपोषित बालकांमधील टीबी तपासणीला वेग

### एनआरसीमध्ये 90 टक्क्यांहून अधिक तपासणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कुपोषित बालकांमध्ये क्षयरोगाचे (टीबी) वेळीच निदान करून त्यांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी राज्यातील पोषण पुनर्वसन केंद्रांमधील (एनआरसी) टीबी तपासणी अधिक प्रभावी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमांतर्गत जुलै २०२६ पर्यंत एनआरसीमध्ये दाखल झालेल्या २९ हजार ४७५ बालकांपैकी २६ हजार ८५७ बालकांची टीबी तपासणी करण्यात आली आहे. तपासणीचे प्रमाण ८९.९ टक्के असून, ते ९० टक्क्यांहून अधिक नेण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

केवळ २०२६ मध्ये जुलैपर्यंत एनआरसीमध्ये ३ हजार ८७ बालके दाखल झाली. त्यापैकी २ हजार ८३५ बालकांची टीबी तपासणी करण्यात आली असून, तपासणीचे प्रमाण तब्बल ९६ टक्के आहे. उर्वरित बालकांची तपासणी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री सचिवालयाच्या २ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या निर्देशांनुसार आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली कुपोषणामागील महत्त्वाचा घटक असलेल्या बाल टीबीच्या निदान, उपचार आणि प्रतिबंधासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. एनआरसीमध्ये दाखल बालकांच्या टीबी तपासणीसाठी मानक कार्यपद्धती, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, निदान सुविधा आणि औषधांचा पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे.

**संपर्कातील बालकांना प्रतिबंधात्मक उपचार**

टीबीच्या संपर्कात आलेल्या मात्र लक्षणे नसलेल्या बालकांना प्रतिबंधात्मक उपचार (टीपीटी) देण्यावर विशेष भर दिला जात आहे. घरगुती तसेच एनआरसीमधील टीबी संपर्क तपासणी मजबूत करण्यात येणार आहे. जटिल, औषध-प्रतिरोधक आणि निदानास आव्हानात्मक बालरुग्णांसाठी उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याची कार्यवाहीही सुरू आहे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'सेवा संकल्प अभियाना'चा बिगुल; 17 सप्टेंबरपासून महिनाभर राबविणार विविध जनहितकारी उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीस २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आगामी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचे लाभ थेट पोहोचवावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या पूर्वलक्षी नियोजनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षस्थानी एक उच्चस्तरीय बैठक पार पडली.



या महत्त्वपूर्ण बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, कार्यकारी अभियंता जलसंधारण नरेंद्र कटके, उच्च शिक्षण सहसंचालक आर. एम. गव्हाणे, कौशल्य विकास विभागाचे सुरेश बहुरे यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील सर्व क्षेत्रीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते.

शासनाच्या विविध सेवा आणि कल्याणकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक विभागाने आपल्या पातळीवर सेवाप्रदानाचे अचूक नियोजन करावे, असे सांगत जिल्हाधिकाऱ्यांनी तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करून नागरिकांची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यावर विशेष भर दिला. सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करून हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन त्यांनी केले. यासंदर्भातील सविस्तर मार्गदर्शक तत्त्वांचा शासन निर्णय ९ सप्टेंबर रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

बैठकीदरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते यांनी उपस्थितांसमोर सादरीकरण करून 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या एकूण १३ विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार, महसूल विभागामार्फत 'सेवासेतू अभियान' राबविले जाईल, तर कौशल्य रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागामार्फत 'इनोव्हेशन चॅलेंज' स्पर्धांचे आयोजन केले जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून 'सेवा माझे योगदान', 'विकसित भारत संकल्प यात्रा' आणि 'सेवा ज्योत यात्रा' काढण्यात येणार आहेत.

याशिवाय, शिक्षण विभागामार्फत 'विकसित भारत' या विषयावर शाळा-महाविद्यालयांमध्ये चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या जातील. महिला व बालविकास विभागामार्फत 'अंगणवाडी उत्सव', 'आशिर्वादाचा दिवा' तसेच योजनांच्या यशकथांवर आधारीत 'बदलाची गोष्ट' हे उपक्रम राबविले जाणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'आभार आणि संकल्पाची रांगोळी' हा उपक्रम पार पडेल. तसेच, जन कल्याणकारी योजनांची माहिती जनमानसात पोहोचविण्यासाठी 'नमो सेवागाथा', 'जल, जन आणि सेवा संकल्प यात्रा' आणि 'जनसेवक महाकुंभ' हे उपक्रम ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911